शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात धोरण.

१२५/३
९५३/२०७

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ७ जून,२००६.

वाचा :- (१) शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.२०/९७/१२,दि.२७ नोव्हेंबर,१९९७.
(२) शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.२०/९७/१२,दि.७ फेब्रुवारी,१९९८.
(३) शासन परिपत्रक,क्रमांक:टिआरएफ-२००५/प्र.क्र.२/०५/१२,दि.१६ फेब्रुवारी,२००५.
(४) शासन परिपत्रक,क्रमांक:टिआरएफ-२००५/प्र.क्र.२/०५/१२,दि.१६ एप्रिल,२००५.
(५) शासन परिपत्रक,क्रमांक:टिआरएफ-२००५/प्र.क्र.२/०५/१२,दि.२९ एप्रिल,२००६.
(६) महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ (दि.१२ मे,२००६ च्या असाधारण राजपत्र भाग-चार मध्ये प्रसिध्द केलेला सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१)
(७) शासन अधिसुचना आणि पृष्ठांकन,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२, दि.२५ मे,२००६.

# प रि प त्र क

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ हा अधिनियम संदर्भाधीन क्र.७ येथील दिनांक २५ मे,२००६ च्या अधिसुचनेनुसार दिनांक १ जुलै,२००६ पासून अंमलात येत आहे. सदर अधिनियमाच्या (मराठी व इंग्रजी) प्रती आणि दिनांक २५ मे,२००६ च्या अधिसुचनेच्या प्रती सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना समक्रमांकाच्या दिनांक २५ मे,२००६ च्या पृष्ठांकनाद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

२. दिनांक १ जुलै,२००६ पासून सदर अधिनियम लागू होत असल्याने सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्या करताना या अधिनियमांतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची त्यांनी दक्षता घ्यावी. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यासंदर्भात या विभागाने सदर अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश दिनांक १ जुलै,२००६ पासून अधिक्रमित झाले असे समजण्यात यावे.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, सदर अधिनियमाच्या कलम-७ मधील तरतुदीनुसार या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मंत्रालयाच्या प्रत्येक विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांची आणि प्रादेशिक विभाग प्रमुखांची सुची तयार करुन ती तातडीने प्रसिध्द करावी. तसेच त्यांच्या अधिकारितेतील बदल्या करण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी तातडीने अधिसुचीत करावेत.

सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर अधिनियम आणि दिनांक २५ मे,२००५ ची अधिसुचना इंटरनेटवर www.maharashtra.gov.in आणि महाराष्ट्र शासनाच्या इंट्रानेटवर www.intranet.maharashtra. gov.in/index.php या संकेतस्थळांवर मराठी व इंग्रजीतून उपलब्ध आहे. याशिवाय त्या शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई येथील व राज्यातील शासकीय विक्री केंद्रामध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

४. सदर अधिनियमाच्या कलम-१४(१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबतचे तपशीलवार नियम यथावकाश स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येतील.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००६०६०७११३२३६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. कुमार

( नवीन कुमार )

अप्पर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव.
सर्व मंत्रालयीन विभागाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय,मुंबई .
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय,मुंबई.
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई .
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
राज्य मुख्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिद्धीकरीता).
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
सामान्य प्रशासन विभाग/का.१२ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीकरीता).
निवडनस्ती.

D. Jagkar-D-124, SGR June-06-2006